# ***वार्तापत्र***

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक २५/०१/२०१७

## ***कामथळा जंगल परीसरात पोलीस-नक्षल चकमक***

- **घटनास्थळावरुन मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त**

मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक २४/०१/२०१७ रोजी उपविभाग पेंढरी अंतर्गत पेंढरी पोस्ट पोर्टी व सी.आर.पी.एफ. संयुक्तपणे नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना दुपारी ०४.०० वा. च्या दरम्यान पोलीस-नक्षल चकमक झाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी आपल्या जवळील साहित्य घटनास्थळीच टाकून जंगलाचा फायदा घेवून पळून गेले.

दरम्यान चकमकीनंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता पोलीसांनी घटनास्थळावरुन नक्षली साहित्य व लिखीत साहित्य तसेच रोजच्या दैनंदिन वापराचे मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त केले आहे.

नक्षलवादयांविरूध्द उपपोस्टे पेंढरी येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.



